# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५)च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालीत राज्य विद्यापीठ)

**(वित्त व लेखा अधिकारी यांचे कार्यालय)**

एम.आय.डि.सी. रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली – ४४२६०५

**श्री. साकेत दशपुत्र**
(एम.सी.ए., सी.एम.ए.,एम.बी.ए.( वित्त)
वित्त व लेखा अधिकारी
भ्रमणध्वणी : ७५८८९७२१८८

संकेतस्थळ : www.unigug.org
ई.मेल :faogug@gmail.com
दुरध्वणी क्र. : ०७१३२-२२३१०६
फॅक्स क्र. : ०७१३२-२२३१०६

जावक क्रमांक/गो.वि./वि.ले.वि./१७७२/२०२२

दिनांक. ६ /१०/२०२२

## अधिसुचना

**प्रति,**

**सर्व शिक्षकेत्तर अधिकारी/कर्मचारी**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**
**जि. गडचिरोली.**

**विषय – संगणकीय उपकरणे निर्लेखित करण्याबाबत**

**संदर्भ :-** सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र.मातंस/नस्ती ०७/ प्र.क्र.८९/३९ दि. ०४/०१/२००८

उपरोक्त संदर्भीय विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, माहिती तंत्रज्ञाचा सुयोग्य वापर करून प्रशासन अधिक गतीमान करण्याच्या दृष्टीने प्रशासकिय कामकाजांचे संगणकिकरण करण्याचे शासनाने धोरण निश्चित केले आहे. कालांतराने संगणकिय उपकरणे ही कालबाह्य होऊन त्यांचे सुटे भाग बाजारात उपलब्ध नसतात, विद्यापीठातील अशी कालबाह्य झालेली संगणकिय उपकरणे संदर्भांकित शासन निर्णयाअन्वये निर्लेखित करावयाची आहेत.

गोंडवाना विद्यापीठामध्ये मागील दहा वर्षाच्या कालावधीमधील निरूपयोगी झालेले प्रिन्टर, स्कॅनर, किबोर्ड, माऊस, पोर्ट स्विच, प्रिन्टर टोनर, लॅपटॉप, मॉनीटर, ईत्यादी संगणकीय उपकरणाचे निर्लेखनाकरीता ठरविलेल्या अपेक्षित किंमतीनुसार निर्लेखन करण्यात येणार आहे. अपेक्षीत किमंतीनुसार निलेखित केलेले उपकरणे घेण्याचा प्रथम हक्क ती उपकरणे ज्यांच्या वापरात होती त्यांचाच राहील असे संदर्भीय शासन निर्णयामध्ये नमुद आहे. त्याअनुषंगाने संगणकीय साहीत्य निर्लेखन करण्यात येणार आहे. सदर साहीत्य निर्लेखनाच्या किंमतीसह दि.१०/१०/२०२२ रोजी कार्यालयीन वेळेत पाहण्यासाठी भांडार विभागात उपलब्ध असुन सर्व शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी यांना कळविण्यात येते की, दिनांक १३ ~~११~~/१०/२०२२ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत निर्लेखनाची घ्यावयाची वस्तु व त्याचे किंमतीसह रोख पटलावर अर्ज सादर करून त्याच दिवशी दुपारी ०४.०० वाजेपर्यंत भांडार विभागास पावती सादर करून साहीत्याची उचल करावे, त्यानंतर साहीत्य गहाळ झाल्यास वित्त व लेखा विभाग जबाबदार राहणार नाही यांची संबंधित सर्व शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी यांनी नोंद घ्यावी.

06/10

**श्री. साकेत दशपुत्र**
वित्त व लेखा अधिकारी,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलीपी-

१) मा. कुलगुरू, यांचे स्विय सहाय्यक, गो.वि. गडचिरोली यांच्या माहितीस्तव सविनय सादर.
२) मा. प्र-कुलगुरू, गो.वि. गडचिरोली यांच्या माहितीस्तव सविनय सादर.
३) मा. कुलसचिव, गो.वि. गडचिरोली यांच्या माहितीस्तव सविनय सादर.
४) सर्व विभाग प्रमुख गो.वि. गडचिरोली. सदर अधिसुचना आपल्या अधिनस्त सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या निर्दशनास आणुन द्यावे.